सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

E-Mail : prajasattaknews24@gmail.com | RNI No. - MAHMAR 2023/84526 | Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

वर्ष - ४ थे | अंक - १८७ वा | अमरावती (महाराष्ट्र) | मंगळवार दि. १ सप्टेंबर २०२६ | संपादक - डॉ. शुभांगी जोशी | मुल्य - १ रु. | पृष्ठ -४

# मोदींचे पुन्हा आवाहन- गरज नसेल तर सोने खरेदी करू नका

## जागतिक संकटात भारताची ७.८% आर्थिक वाढ, हे जनतेच्या कष्टाचे फळ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १नवी दिल्ली-** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाच्या ७.८% आर्थिक वाढीबद्दल देशवासियांचे अभिनंदन केले. ते म्हणाले की, हे यश देशवासियांच्या इच्छाशक्ती, मेहनत आणि सामूहिक ताकदीचा परिणाम आहे.त्यांनी मंगळवारी सोशल मीडियावर एक व्हिडिओ जारी करून ही माहिती दिली. पंतप्रधानांनी पुन्हा लोकांना सोने खरेदीबाबत आवाहन केले. ते म्हणाले, 'गरज नसेल तर सोने खरेदी करू नये.' असेच आवाहन त्यांनी गत ११ मे रोजी केले होते.पंतप्रधान मोदी म्हणाले- देशातही काही लोक निराशा पसरवण्यात आणि खोट्याच्या आधारावर वातावरण खराब करण्यात गुंतले आहेत. या सर्व आव्हानांवर मात करत भारताने ७.८% विकास दर गाठला आहे. देशाला हीच गती कायम ठेवावी लागेल आणि पुढेही वेगाने विकास करावा लागेल.ते म्हणाले, परदेशात फिरण्यासाठी प्रवास करणे आणि परदेशात लग्न करणे टाळावे. लोकांनी 'मेक इन इंडिया'च्या मंत्रासह पुढे जायला हवे. गरज




नसल्यास सोने खरेदी करू नये. देशात जितका जास्त स्वदेशी आणि आत्मनिर्भरतेवर भर दिला जाईल, तितक्याच मजबूतपणे भारत पुढे जाईल.मला पूर्ण विश्वास आहे की जेव्हा भारत आपल्या स्वातंत्र्याची १०० वर्षे पूर्ण करेल, तेव्हा देशाच्या युवा पिढीला एक विकसित भारत सोपवला जाईल.भारताचा परकीय चलन साठा जपण्यासाठी पंतप्रधान मोदी हे आवाहन करत आहेत. भारत आपल्या एकूण सोन्याच्या वापरापैकी सुमारे ९९% सोने आयात करतो. २०२५-२६ मध्ये, सोन्याच्या आयातीवरील खर्च सुमारे ६.४ लाख कोटी रुपये इतका होता. आयातीवरील खर्चाच्या बाबतीत सोन्याचा क्रमांक दुसरा लागतो. परदेशातून खरेदी केलेल्या एकूण वस्तूंच्या मूल्यापैकी ९% वाटा सोन्याचा असतो. थोडक्यात सांगायचे तर, तुम्ही सोने खरेदी करणे टाळले, तर भारताचे आयातीवरील बिल कमी होईल. यामुळे डॉलर साठा स्थिर राहण्यास आणि रुपयाचे मूल्य वेगाने घसरण्यापासून रोखण्यास मदत होईल.

# दोषींवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यासही मागेपुढे पाहणार नाही

## चंद्रशेखर बावनकुळे यांचा कडक इशारा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अमरावती** । जिल्हा स्त्री रुग्णालयातील अतिदक्षता विभागात (डछ्उण) लागलेल्या आगीत तीन नवजात बालकांचा मृत्यू झाल्याची घटना अत्यंत गंभीर व असह्य आहे. या प्रकरणाच्या चौकशीसाठी उच्चस्तरीय समिती गठीत करण्यात आली असून, अहवाल आल्यानंतर दोषी आढळणाऱ्यांवर थेट सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात येईल, असा कडक इशारा चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिला. अमरावती व नंतर नागपूर येथे माध्यमांशी संवाद साधताना त्यांनी रुग्णालयातील आग, फायर ऑडिटमधील त्रुटी, विरोधकांचे आरोप आणि वनहक्क कायद्याच्या अंमलबजावणीसह विविध विषयांवर भूमिका स्पष्ट केली.रुग्णालयातील घटनेची माहिती देताना बावनकुळे म्हणाले, आग लागल्यानंतर रुग्णालयातील परिचारिका, सुरक्षा रक्षक आणि कर्मचाऱ्यांनी धावपळ करून ३६ बालकांना सुखरूप बाहेर काढले. त्यापैकी व्हेंटिलेटरवर असलेल्या बालकांची प्रकृती आता स्थिर असून ती नॉर्मल ऑक्सिजनवर आहेत. घटना घडल्यापासून मी जिल्हाधिकारी व आरोग्य यंत्रणेशी सतत संपर्कात होतो. आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी स्वतः घटनास्थळी भेट दिली. याप्रकरणी एम्स मधील तज्ज्ञ, तंत्रज्ञ आणि अग्निशामक अधिकाऱ्यांची उच्चस्तरीय समिती तपास करत आहे. समितीचा अहवाल आल्यानंतर कोणीही दोषी आढळल्यास सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल केला जाईल.

### हनुमान गढी निधी वादावर स्पष्टीकरण

विरोधकांकडून करण्यात येत असलेल्या टीकेवर बोलताना ते म्हणाले की, सरकारचे बजेट विविध खात्यांमध्ये विभागलेले असते. पर्यटनाचा आणि तीर्थक्षेत्र विकासाचा निधी वेगळा असतो तर आरोग्याचा निधी वेगळा असतो. अमरावतीमध्ये हनुमान गढीच्या विकासासाठी आणि शहरात ११० कोटींचे सीसीटीव्ही नेटवर्क उभारण्यासाठी स्वतंत्र बजेटमधून तरतूद करण्यात आली असून धार्मिक स्थळांच्या विकासाचा आणि या दुर्दैवी घटनेचा संबंध जोडणे चुकीचे असल्याचे ते म्हणालेत.

# २०२९ पर्यंत राज्य नशामुक्त करण्याचा संकल्प

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१मुंबई-** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी (१ सप्टेंबर) झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत चार महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. राज्यातून अंमली पदार्थांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी २०२९ पर्यंतची उद्दिष्टपूर्ती निश्चित करण्यात आली असून, त्यासाठी संपूर्ण शासन यंत्रणेने एकत्रितपणे काम करण्याचे धोरण स्वीकारण्यात आले आहे. याशिवाय सरकारी बैठका आणि कार्यक्रमांमध्ये आरोग्यदायी अन्नपदार्थ उपलब्ध करून देणे, सोलापूरमधील उन्नत मार्ग प्रकल्पाला निकडीचा सार्वजनिक प्रकल्प घोषित करणे आणि पुणे जिल्ह्यातील कुकडी



पाटबंधारे प्रकल्पाच्या सुधारित खर्चाला मंजुरी देण्याचे निर्णय घेण्यात आले.

अंमली पदार्थांच्या वाढत्या समस्येला आळा घालण्यासाठी राज्य सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. सन २०२९ पर्यंत महाराष्ट्रातून अंमली पदार्थांचे समूळ उच्चाटन करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. त्यासाठी 'नशामुक्त भारत अभियान'च्या माध्यमातून राज्यात सर्वसमावेशक शासकीय दृष्टिकोन अर्थात 'व्होल ऑफ गव्हर्नमेंट अप्रोच' धोरण राबविण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली. या धोरणानुसार अंमली पदार्थांविरोधातील लढा केवळ पोलिस किंवा गृह विभागापुरता मर्यादित राहणार नाही. शासनाच्या विविध विभागांमध्ये समन्वय साधून अंमली पदार्थांची निर्मिती, तस्करी, वितरण आणि सेवन यावर नियंत्रण आणण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. यामध्ये प्रतिबंधात्मक उपाययोजना, अंमली पदार्थांविरोधातील कारवाई आणि जनजागृतीला महत्त्व दिले जाण्याची शक्यता आहे. राज्यातील तरुणांमध्ये अंमली पदार्थांच्या वाढत्या वापराला आळा घालण्याच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे.

# अण्णा हजारेंच्या प्रकृतीबाबत डॉक्टरांनी दिली अपडेट, पुढील ३-४ दिवस महत्त्वाचे

## किडनीवर परिणाम, युरिन इन्फेक्शनचाही त्रास

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१मुंबई-** ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या प्रकृतीबाबत महत्त्वाची माहिती समोर आली आहे. गेल्या काही आठवड्यांपासून व्हायरल इन्फेक्शन, ताप, अशक्तपणा आणि शरीरातील पाण्याची कमतरता यामुळे त्रस्त असलेल्या अण्णा हजारेंना सोमवारी रात्री पुढील उपचारांसाठी मुंबईतील बॉम्बे हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. प्रकृती खालावल्याने त्यांना राळेगणसिद्धीजवळील रुग्णालयातून मुंबईत हलवण्यात आले होते.

अण्णा हजारे यांच्यावर उपचार करणारे फिजिशियन आणि संसर्गजन्य आजारांचे तज्ज्ञ डॉ. गौतम भन्साळी यांनी त्यांच्या प्रकृतीबाबत माहिती दिली आहे. अण्णांची प्रकृती सध्या स्थिर असून उपचारांना ते चांगला प्रतिसाद देत आहेत. मात्र, दीर्घकाळ चाललेल्या व्हायरल इन्फेक्शनमुळे त्यांच्या किडनीवर परिणाम होण्याची चिन्हे दिसून आली होती. तसेच युरिन इन्फेक्शन आणि शरीरातील पाण्याची कमतरता यामुळे त्यांना रुग्णालयात दाखल करून अधिक तपासण्या करण्याचा निर्णय घेण्यात आला.

महिनाभरापासून व्हायरल इन्फेक्शनचा त्रास

डॉ. गौतम भन्साळी यांनी दिलेल्या माहितीनुसार, अण्णा हजारे यांना सुमारे



महिनाभरापासून व्हायरल तापाचा त्रास होता. यादरम्यान त्यांना अनेकदा जुलाब आणि अशक्तपणाचाही सामना करावा लागला. त्यामुळे ते राळेगणसिद्धीजवळील रुग्णालयात उपचार घेत होते. काही दिवसांपासून त्यांची प्रकृती काहीशी खालावत गेली. व्हायरल इन्फेक्शन वाढण्यासोबतच शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी झाले आणि त्याचा परिणाम त्यांच्या किडनीवर होण्यास सुरुवात झाल्याचे डॉक्टरांच्या लक्षात आले. त्यामुळे कोणतीही पुढील गुंतागुंत निर्माण होऊ नये आणि अधिक सखोल तपासण्या करता याव्यात, यासाठी त्यांना मुंबईतील बॉम्बे हॉस्पिटलमध्ये हलवण्यात आले. सोमवारी रात्री साडेआठच्या सुमारास त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले.

डॉक्टरांनी उपचार सुरू केल्यानंतर त्यांच्या प्रकृतीत सुधारणा होत असल्याचे सांगितले. अण्णा सध्या व्यवस्थित जेवण घेत असून पाणीही पित आहेत. उपचारांना त्यांचा चांगला प्रतिसाद मिळत असल्याने डॉक्टरांनी दिलासा व्यक्त केला आहे. अण्णांना रुग्णालयातील विशेष कक्षात ठेवण्यात आले असून, डॉक्टरांच्या म्हणण्यानुसार त्यांना अतिदक्षता विभागात ठेवण्याची आवश्यकता भासलेली नाही.

# ठाकरे पिता - पुत्राचे 'मिशन मराठवाडा'

## विधान परिषद आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पार्श्वभूमीवर दौरा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१मुंबई-** विधान परिषद निवडणुका आणि आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पार्श्वभूमीवर उबाठा पक्षाने मराठवाड्यात आपले राजकीय वर्चस्व पुन्हा प्रस्थापित करण्यासाठी 'मिशन मराठवाडा'ची जोरदार आखणी केली आहे. ३ सप्टेंबर रोजी युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे छत्रपती संभाजीनगरात दाखल होऊन डेव्हलपमेंट डिलेड, डेव्हलपमेंट डिनाइड' या भूमिकेतून सरकारचा हिशेब मागितला जाईल.



१६ आणि १७ सप्टेंबर रोजी उद्धव ठाकरे संभाजीनगरात मुक्कामी आहेत. १७ सप्टेंबर या मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाचे औचित्य साधून ठाकरे गट मराठवाड्याशी असलेले आपले पारंपरिक आणि राजकीय नाते अधिक घट्ट करण्याच्या तयारीत आहे.

**संघटना मजबूत करणार**

छत्रपती संभाजीनगर-जालना, बीड- लातूर- धाराशिव आणि नांदेड- हिंगोली- परभणी या विधान परिषद मतदारसंघांवर लक्ष केंद्रित करत पक्षसंघटना मजबूत करणे हा या दौऱ्याचा मुख्य अजेंडा असल्याचे सांगण्यात आले.

# नवरात्री आधी ठाकरेंच्या शिवसेनेला मोठे भगदाड?

## १४ आमदार शिंदे गटाच्या संपर्कात असल्याचा दावा

## ३ मंत्र्यांवर 'ऑपरेशन टायगर'ची जबाबदारी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१मुंबई -** महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा एकदा पक्षफुटीच्या चर्चांना उधाण आले आहे. उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना ठाकरे गटाचे तब्बल १४ आमदार नवरात्रीपूर्वी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत प्रवेश करणार, असा दावा शिंदे गटातील एका बड्या नेत्याने केल्याची माहिती समोर आली आहे. या संभाव्य पक्षप्रवेशाची जबाबदारी कोकण, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रातील ३ मंत्र्यांवर सोपवण्यात आल्याचेही सांगितले जात आहे.

विशेष म्हणजे, काही महिन्यांपूर्वीच ठाकरे गटातील ६ खासदारांनी शिंदे गटाची साथ धरल्याची चर्चा झाली होती. त्यानंतर आता विधानसभा सदस्यांबाबतही असाच दावा पुढे




आल्याने महाराष्ट्राच्या राजकारणात नव्या राजकीय भूकंपाचे संकेत मिळत आहेत. मात्र, ठाकरे गटाचे आमदार कैलास पाटील यांनी हे आरोप फेटाळून लावत ठाकरे गटाचा एकही आमदार पक्ष सोडणार नाही, असा दावा केला आहे. त्यामुळे १४ आमदार नेमके कोण? ते खरोखर शिंदे गटाच्या संपर्कात आहेत का? आणि या चर्चेमागे नेमकी रणनीती काय आहे? याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

### 'ऑपरेशन टायगर - पार्ट २'ची चर्चा

शिंदे गटातील सूत्रांच्या दाव्यानुसार, ठाकरे गटातील १४ आमदारांना आपल्या पक्षात आणण्यासाठी विशेष राजकीय मोहीम सुरू असल्याचे सांगितले जात आहे. या मोहिमेला 'ऑपरेशन टायगर पार्ट २' असे संबोधले जात आहे. या आमदारांशी संपर्क साधण्याची आणि त्यांना शिंदे यांच्या शिवसेनेत आणण्याची जबाबदारी ३ मंत्र्यांवर देण्यात आल्याचा दावा आहे. कोकण, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रातील या मंत्र्यांमार्फत संबंधित आमदारांशी चर्चा सुरू असल्याची माहिती सूत्रांकडून देण्यात आली आहे.

### ठाकरे गटाकडे सध्या २० आमदार


२०२४च्या विधानसभा निवडणुकीत ठाकरे गटाचे २० आमदार निवडून आले आहेत. त्यामुळे १४ आमदारांनी शिंदे गटात प्रवेश केला तर ठाकरे गटाच्या विधिमंडळातील संख्याबळावर मोठा परिणाम होऊ शकतो. ठाकरे गटाच्या सध्याच्या २० आमदारांमध्ये मेहकरचे सिद्धार्थ खरात, दर्यापूरचे गजानन लवाटे, बाळापूरचे नितीन देशमुख, वणीचे संजय देरकर, परभणीचे राहुल पाटील, विक्रोळीचे सुनील राऊत, जोगेश्वरी पूर्वचे अनंत ऊर्फ बाळा नर, दिंडोशीचे सुनील प्रभू, वर्सोव्याचे हारून खान, कलिनाचे संजय पोतनीस, वांद्रे पूर्वचे वरुण सरदेसाई, माहीमचे महेश सावंत, वरळीचे आदित्य ठाकरे, शिवडीचे अजय चौधरी, भायखळ्याचे मनोज जामसूतकर, खेड-आळंदीचे बाबाजी काळे, उमरग्याचे प्रवीण स्वामी, उस्मानाबादचे कैलास पाटील, बार्शीचे दिलीप सोपल आणि गुहागरचे भास्कर जाधव यांचा समावेश आहे. यापैकी नेमके कोणते १४ आमदार शिंदे गटाच्या संपर्कात आहेत, याबाबत मात्र कोणतेही अधिकृत नाव जाहीर झालेले नाही.

# धनुष्यबाण गोठवण्याची मागणी दुर्दैवी

## एकनाथ शिंदेंचा उद्धव ठाकरेंवर निशाणा,

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१नवी दिल्ली** शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाणाच्या मुद्द्यावरून सुरू असलेल्या कायदेशीर लढाईच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे गटावर जोरदार निशाणा साधला आहे. 'धनुष्यबाण गोठवण्याची मागणी करणे दुर्दैवी आहे,' अशी टीका शिंदे यांनी केली. तसेच शिवसेना पक्षाची घटना, लोकशाही आणि निवडणूक आयोगाचे अधिकार या सर्व बाबींचा विचार करावा लागेल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

शिंदे सध्या दिल्ली दौऱ्यावर असून त्यांनी शिवसेनेच्या न्यायालयीन लढाईपासून मराठा आरक्षण, मनोज जरांगे पाटील यांचे आंदोलन, धनुष्यबाणाचे चिन्ह, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावरील विरोधकांची टीका आणि देशाच्या अर्थव्यवस्थेपर्यंत विविध मुद्द्यांवर भूमिका मांडली.शिवसेना पक्षाच्या संदर्भातील प्रकरणावर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू आहे. या पार्श्वभूमीवर शिंदे म्हणाले की, संबंधित वकिलांनी युक्तिवाद करताना काही प्रश्न उपस्थित केले असतील तर ते त्यांचे काम आहे. मात्र, शेवटी पक्षाची घटना, देशाची घटना, लोकशाही आणि निवडणूक



आयोगाचे अधिकार या सर्व बाबी महत्त्वाच्या आहेत.शिवसेनेच्या वतीने आता या मुद्द्यांवर उत्तर देण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. त्यामुळे न्यायालयीन प्रक्रियेत काय भूमिका मांडली जाते, याकडे लक्ष असल्याचे त्यांनी सांगितले. धनुष्यबाण हे चिन्ह गोठवण्याची मागणी केली जात असल्याबाबत शिंदे यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. धनुष्यबाण हे शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या आत्मसन्मानाचा आणि श्रद्धेचा विषय असल्याचे ते म्हणाले.

## संपादकीय ......

# उत्सवांचे व्यापारीकरण

*उत्सवांचे व्यापारीकरण आणि धार्मिक उत्सवांतून आपले राजकारण पुढे रेटण्याची सवय येथील राजकारण्यांनी लोकांना लावली आहे. ही सवय आता येथील जनमानसांमध्ये इतकी अंगवळणी पडली आहे की त्यातून उत्सवांचा उद्देश बाजूला पडून केवळ शक्तिप्रदर्शन, मंडळांमधील स्पर्धाच मागे उरल्या आहेत का, अशी शंका यावी. सोलापूरमध्ये तेथील गणेश मंडळांनी कृती समिती स्थापन करून डीजेमुक्त सण उत्सवाच्या दिशेने सकारात्मक पाऊल टाकले आहे. पुण्यातही रविवारी डीजेमुक्त गणेशोत्सवाच्या बाजूने असलेल्या समविचारी मंडळींची डेक्कन जिमखाना येथील गुडलक चौकात बैठक झाली. त्याचे स्वागतच व्हायला हवे. लोकांना बदल हवा असतो, मात्र त्यासाठी कुणीतरी पुढाकार घेण्याची गरज असते, असा पुढाकार सत्तेत असलेले किंवा राजकीय पक्षांचे प्रतिनिधी नेते घेत नाहीत, त्यांना उत्सवांच्या धार्मिक महत्वापेक्षा कार्यकर्त्यांना खुश करून आपले राजकीय समर्थन वाढवण्यातच अधिक रस असतो. कर्णकर्कश्य गोंगाट, छातीत धडकी भरवणारा, हादरवणारा, रक्तदाब वाढवणारा डीजेचा बास, डोळे दीपवणार्या त्रासदायक अवाजवी एलईडी रोषणाईमुळे बाळकृष्ण आणि गणपती बाप्पालाही त्रासच होणार आहे, एवढी बुद्धी तरी, बुद्धीदात्या श्री गणेशाचा उत्सव साजरा करताना आयोजकांना असायला हवी.*

*पुण्यातील गणेशोत्सवात डीजे आणि कर्णकर्कश्य साऊंड सिस्टीमवर बंदी घालण्याची आग्रही मागणी केल्यामुळे विद्यानंद बापट हे सध्या चर्चेत आले आहेत. पुणे महानगरपालिकेच्या गणेशोत्सव पूर्वतयारी बैठकीत नारायण पेठेतील रहिवासी असलेल्या विद्यानंद बापट यांनी पुण्यात गणेशोत्सवादरम्यान डीजे आणि लाऊडस्पीकरवर सरसकट बंदी घालण्याची मागणी केली. सोलापूरच्या धर्तीवर पुण्यातही ध्वनिप्रदूषण आणि वाहतूक कोंडी टाळण्यासाठी डीजे आणि तीव्र आवाजाच्या साऊंड सिस्टीमवर अंकुश ठेवला जावा, अशी त्यांची भूमिका आहे. त्यांच्या या भूमिकेमुळे गणेश मंडळांच्या कार्यकर्त्यांसोबत या बैठकीत त्यांचा वाद निर्माण झाला. बापट यांना या बैठकीतून बाहेर जाण्यास सांगण्यात आले. यानंतर हा मुद्दा सोशल व इलेक्ट्रॉनिक माध्यमांवर चर्चेचा विषय ठरला. राज्यातही विशेषत: मुंबई, पुण्यासारख्या शहरांमध्ये धार्मिक उत्सवांचे स्वरुप बदलून त्याचा इव्हेंट होत असल्याचे चित्र आहे. दहीहंडी, गणेशोत्सवात हा विषय सातत्याने समोर आणला जातो. या इव्हेंटीकरणाचे लोण ग्रामीण भागातही पसरले आहे. अगदी भीमजयंती, ईद किंवा इतर धर्मातील धार्मिक उत्सवांतील डीजेच्या दणदणाटाचे व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. त्यामुळे धार्मिक किंवा सामाजिक सण उत्सवांचा उद्देशच मागे पडत चालला आहे. राजकीय नेते, स्थानिक पुढारी त्याला बळ देत आहेत. महापुरुषांच्या जयंतीत विचारांचा उत्सव करण्यापेक्षा डीजेचा दणदणाट, ध्वनीप्रदूषणातून केल्या जाणार्या शक्तिप्रदर्शनावरही टीका होते. यावेळी तुम्हाला केवळ विशिष्ट धर्मातील सण उत्सवांमधीलच चुकीचे प्रकार दिसतात का, असा एक साळसूद आणि बचावात्मक, दिशाभूल करणारा पवित्रा अशा सण उत्सवांचे इव्हेंटीकरण करणार्यांकडून घेतला जातो.*

*दहीहंडी उत्सवातील थरांच्या स्पर्धा वाढवताना या स्पर्धा अनेकदा बाळगोपाळांसाठी जीवघेण्या ठरत असतात. गोपाळकाल्यातही दहीहंडी ही फोडण्यासाठी नसून ती स्पर्धेसाठीच असल्याचे यातून स्पष्ट व्हावे. मुंबई पुण्यात दोन इमारतींमध्ये सुरक्षित उंचीवर उभारलेल्या दहीहंड्या आता खूपच कमी झाल्या आहेत. एका मोठ्या मैदानात उंच क्रेनला दहीहंडी अडकवली जाते. यातून आपण कोणता धार्मिक, सामाजिक उद्देश साध्य करत आहोत, याचे भान सुटले आहे. सार्वजनिक गणेशोत्सव साजरा करण्याचा महापुरुषांचा उद्देश काय होता आणि आज या उत्सवांची काय परिस्थिती झाली आहे, याचा विचार आता तरी आपण करणार आहोत का, दहीहंडीतील थरांच्या स्पर्धांसाठी लाखोंच्या बक्षीसाची लयलूट होते. नऊ दहा थर उभारण्याचा आनंद मोठा असतो, परंतु या स्पर्धांमध्ये जायबंदी झालेल्या आणि मृत्यू पावलेल्या गोविंदांच्या कुटुंबियांच्या पदरात पडलेल्या आयुष्यभराच्या दु:खावर गोविंदांसाठीच्या विमा योजनेची राजकीय घोषणा एवढाच उपाय पुरेसा नाही. गणेशोत्सवातही गणेशमंडळात सुरू असलेल्या उंचच उंच गणेशमूर्तींच्या स्पर्धांचे प्रयोजन काय, यातून कोणता धार्मिक आणि सामाजिक उद्देश साध्य केला जातो, भुलेश्वरमधील गणेशमूर्ती दुर्घटनेनंतर या विषयाचा गांभीर्याने विचार करणे अत्यंत गरजेचे आहे, नव्हे अशा अप्रिय घटना होऊ नयेत यासाठी ठोस उपाय करायलाच हवा, त्यासाठी गणेशमूर्तींच्या उंचीवर कायदेशीर नियंत्रण हवे. आज पर्यावरणपूरक उत्सव साजरे करण्यासाठी सरकारकडून प्रोत्साहन दिले जाते, त्याचे स्वागतच, परंतु उत्सवांचे इव्हेंटीकरणही तातडीने रोखायला हवे. बदलापूरमध्ये दहीहंडी सरावादरम्यान अगदी वरच्या आठव्या नवव्या थरावरील बालगोविंदाचा सेफ्टी बेल्ट तुटल्याने हा चिमुकला उंचावरून कोसळल्याची घटना घडली. सुदैवाने त्याला गंभीर इजा झाली नाही, येत्या दहीहंडी स्पर्धेतील दुर्घटनांचा हा गंभीर इशारा नाही का? सेफ्टी बेल्ट, सुरक्षितता या उपाययोजनांपेक्षा असे धोकादायक थर उभारण्यावरच नियंत्रण आणता येणार नाही का, तशी येथील राजकीय नेते, सरकारमधील लोकप्रतिनिधींचीच इच्छा नसावी, कारण त्यांना या अशा धार्मिक उत्सवांच्या नावाखाली प्रतिष्ठेच्या स्पर्धा भरवून आपला दबदबा, प्रभाव आणि राजकीय शक्तीदाखवण्याची संधी मिळते. एवढ्या मोठ्या प्रमाणात तरुणाई एकत्र आल्यावर त्यांच्यावर उत्सवापुरत्या काळात बक्षिसांची लयलूट करून आपले राजकीय हेतूच त्यांना साध्य करायचे असतात. हे करताना सामान्य लोकांना त्रास होत आहे, त्यांचा बळी जात आहे, याचे त्यांना सोयीस्कर विस्मरण होत आहे.गेल्याच आठवड्यात राज्य सरकारने 'महाराष्ट्र शासन कार्यपद्धती नियम, २०२६' अधिसूचीत केले होते. या नियमांच्या माध्यमातून मुख्यमंत्र्यांना कुठल्याही मंत्र्यांचा निर्णय फिरवण्याचे सर्वाधिकार प्राप्त झाले आहेत. हे नियम मंजूर होऊन आठवडा उलटत नाही, तोच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांच्या मराठी सक्तीच्या निर्णयाला ब्रेक लावला. हा झटका केवळ एका खात्यापुरता मर्यादित नसून तो थेट शिवसेना शिंदे गट आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या राजकीय आकांक्षांवर केलेला आघात मानला जात आहे. खरे तर १९७५ च्या जुन्या नियमावलीतही मुख्यमंत्र्यांना मंत्र्यांचे निर्णय रद्द करण्याचे किंवा त्यात हस्तक्षेप करण्याचे अधिकार होते; परंतु 'महाराष्ट्र शासन कार्यपद्धती नियम, २०२६' मुळे हे अधिकार अधिक स्पष्ट, मजबूत आणि कायदेशीर चौकटीत घट्ट बसवणारे ठरले आहेत. या नव्या नियमावलीच्या माध्यमातून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रशासकीय आणि राजकीय निर्णयांवर आपले पूर्ण नियंत्रण सिद्ध केले आहे.*

# प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध, 'एसआयआर'मध्ये जिल्ह्यात २१ लाख ९२ हजार ३९५ मतदार

## ३ लाख ५३ हजार २८२ मतदारांची नावे वगळली; २२ मतदान केंद्रांची वाढ

### ३० सप्टेंबरपर्यंत दावे हरकती नोंदवावे जिल्हाधिकारी आशिष येरेकर

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१अमरावती–** जिल्ह्यात राबविण्यात आलेल्या विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) मोहिमेअंतर्गत सोमवार, ३१ ऑगस्ट २०२६ रोजी प्रसिद्ध प्रारूप मतदार यादीनुसार ८ विधानसभा मतदार संघामध्ये एकूण २१ लाख ९२ हजार ३९५ मतदारांची नोंद असून ३ लाख ५३ हजार २८२ मतदारांची नावे वगळण्यात आली आहेत. जिल्ह्यातील एकूण मतदार केंद्रांची संख्या प्रस्तावित मतदान केंद्र आणि समायोजना अंती २ हजार ६८२ वरून वाढून २ हजार ७०४ झाली आहे. सर्व पात्र मतदारांनी आणि वगळण्यात आलेल्या मतदारांनी ३१ ऑगस्ट ते ३० सप्टेंबर २०२६ दरम्यान संबंधित मतदार नोंदणी अधिकारी, सहायक नोंदणी अधिकारी यांच्याकडे दावे व आक्षेप नोंदवावे, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी केले आहे.भारत निवडणूक आयोगाद्वारे देशभरात मतदार याद्यांचे विशेष सखोल पुनरीक्षण हाती घेण्यात आले आहे. या मोहिमेचा तिसरा टप्पा महाराष्ट्रासह १६ राज्य व ३ केंद्रशासित प्रदेशात राबविला जात आहे. या मोहिमेअंतर्गत 'एकही पात्र नागरिक सुटणार नाही आणि एकही अपात्र नागरिक समाविष्ट होणार नाही.' या उद्दिष्ट्याने अमरावती जिल्ह्यात मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांमार्फत (बीएलओ) २५ लाख ४५ हजार ६७७मतदारांच्या तपशिलाची प्रत्यक्ष खातर जमा करण्यात आली आहे. त्यानुसार ३१ ऑगस्ट २०२६ रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्याात आली आहे. यात जिल्ह्यातील एकूण ८ विधानसभा मतदार संघात ११ लाख २४ हजार ८३ पुरूष मतदार तर १० लाख ६८ हजार २५१ महिला मतदार आणि ६१ तृतीयपंथी मतदार असे एकूण २१ लाख ९२ हजार ३९५ मतदारांची नोंद करण्यात आली आहे. मय्यत मतदार वगळता जिल्ह्यातील एकही पात्र मतदार यादीमध्ये येण्यापासून वंचित राहू नये. या उद्देशाने पात्र मतदारांना गणनापत्रक बीएलओकडे जमा करण्यासाठी अधिकृत संकेतस्थळावर यादी उपलब्ध करून देण्यात आली होती. या प्रक्रियेअंती ३१ ऑगस्ट २०२६ रोजी प्रसिद्ध प्रारूप मतदार यादीतून ३ लाख ५३ हजार २८२ मतदारांची नावे वगळण्यात आली आहेत.

**जिल्ह्यात २१ लाख ९२ हजार ३९५ मतदार–** प्रारूप मतदार यादीमध्ये धामणगाव रेल्वे विधानसभा मतदार संघात १ लाख ३८ हजार ४६५ पुरूष, तर १ लाख ३० हजार ९३५ महिला मतदार आणि १ तृतीयपंथी मतदार असे एकूण २ लाख ६९ हजार ४०१ मतदार नोंदण्यात आले आहेत. बडनेरा विधानसभा मतदार संघात १ लाख ५६ हजार ८३१ पुरूष, तर १ लाख ५३ हजार ९१५ महिला मतदार आणि ३२ तृतीयपंथी मतदार असे एकूण ३ लाख १० हजार ७७८ मतदार नोंदण्यात आले आहेत.अमरावती विधानसभा मतदार संघात १ लाख ५१ हजार ८२ पुरूष, तर १ लाख ४८ हजार ५०४ महिला मतदार आणि १८ तृतीयपंथी मतदार असे एकूण २ लाख ९९ हजार ६०४ मतदार नोंदण्यात आले आहेत. तिवसा विधानसभा मतदार संघात १ लाख २८ हजार ९३ पुरूष, तर १ लाख १९ हजार १८६ महिला मतदार असे एकूण २ लाख ४७ हजार २७९ मतदार नोंदण्यात आले आहेत.दर्यापूर विधानसभा मतदार संघात १ लाख ४२ हजार ९८४ पुरूष, तर १ लाख ३२ हजार ८६५ महिला मतदार आणि ३ तृतीयपंथी मतदार असे एकूण २ लाख ७५ हजार ८५२ मतदार नोंदण्यात आले आहेत. मेळघाट विधानसभा मतदार संघात १ लाख ४० हजार ६१० पुरूष, तर १ लाख ३३ हजार ११२ महिला मतदार आणि ७ तृतीयपंथी मतदार असे एकूण २ लाख ७३ हजार ७२९ मतदार नोंदण्यात आले आहेत.अचलपूर विधानसभा मतदार संघात १ लाख ३१ हजार २१५ पुरूष, तर १ लाख २२ हजार ८३ महिला मतदार असे एकूण २ लाख ५३ हजार २९८ मतदार नोंदण्यात आले आहेत. मोर्शी विधानसभा मतदार संघात १ लाख ३४ हजार ८०३ पुरुष, तर १ लाख २७ हजार ६५१ महिला मतदार असे एकूण २ लाख ६२ हजार ४५४ मतदार नोंदण्यात आले आहेत.

प्रसिद्ध प्रारूप मतदार यादीतून १ लाख ९ हजार ३०७ मय्यत, आढळून नआलेले २२ हजार ३५७, कायम स्तलांतरीत १ लाख ६४ हजार ५१३ आणि ९७८ इतर तसेच ५६ हजार १४२ आधिच नोंदलेले मतदार अशा एकूण ३ लाख ५३ हजार २८२ मतदारांची नावे वगळण्यात आली आहेत. धामणगाव रेल्वे विधानसभा मतदार संघातील १० हजार ६८१ मय्यत, आढळून नआलेले १ हजार ४९५, कायम स्तलांतरीत २३ हजार ६९४ आणि ८४ इतर तसेच ४ हजार ४८३ आधिच नोंदलेले मतदार असे एकूण ४० हजार ४३७ मतदार वगळण्यात आले आहेत. बडनेरा विधानसभा मतदार संघातील २३ हजार ६६७ मय्यत, आढळून नआलेले ३ हजार ५२३, कायम स्तलांतरीत २५ हजार ९८३ आणि २६४ इतर तसेच १० हजार ३३१ आधिच नोंदलेले मतदार असे एकूण ६३ हजार ७६८ मतदार वगळण्यात आले आहेत.अमरावती विधानसभा मतदार संघातील १८ हजार ९२० मय्यत, आढळून नआलेले ९ हजार २४९, कायम स्तलांतरीत ३० हजार ५१५ आणि १३६ इतर तसेच १६ हजार ९७६ आधिच नोंदलेले मतदार असे एकूण ७५ हजार ७९६ मतदार वगळण्यात आले आहेत. तिवसा विधानसभा मतदार संघातील १४ हजार ७८० मय्यत, आढळून नआलेले २ हजार ६४, कायम स्तलांतरीत २३ हजार ७३२ आणि ८७ इतर तसेच ७हजार ६५९ आधिच नोंदलेले मतदार असे एकूण ४८ हजार ३२२ मतदार वगळण्यात आले आहेत.



#### जिल्ह्यात २२ मतदान केंद्रांची वाढ

प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध होण्यापूर्वी नवीन प्रस्तावित मतदान केंद्र व समायोजन मतदान केंद्र याद्वारे मतदान केंद्रांचे सुसूत्रिकरण करण्यात आले आहे. यानुसार अस्तित्वात असलेल्या २ हजार ६८२ मतदान केंद्रांची संख्या वाढून २ हजार ७०४ झाली आहे. बडनेरा विधानसभा मतदार संघात मतदान केंद्रांची संख्या ३४५ वरून वाढून ३५४ झाली आहे. अमरावती विधानसभा मतदार संघात मतदान केंद्रांची संख्या ३२२ वरून वाढून ३२८ झाली आहे. मेळघाट विधानसभा मतदार संघात मतदान केंद्रांची संख्या ३५६ वरून वाढून ३६३ झाली आहे.

#### ३० सप्टेंबर पर्यंत दावे हरकती नोंदवण्याचे आवाहन

अमरावती जिल्ह्यातील सर्व पात्र मतदारांनी आणि वगळण्यात आलेल्या मतदारांनी ३१ ऑगस्ट ते ३० सप्टेंबर २०२६ दरम्यान संबंधित मतदार नोंदणी अधिकारी, सहायक नोंदणी अधिकारी यांच्याकडे दावे व आक्षेप नोंदवावे, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी केले आहे. १ आक्टोबर २०२६ रोजी वयाची १८ वर्ष पूर्ण करणाऱ्या नव मतदारांनी फॉर्म क्रं. ६ भरून मतदार यादीत नाव नोंदवावे, असे आवाहनही करण्यात आले आहे.

# धारणीत सागवान तस्करीवर वनविभागाचा छापा

## २७ नग जप्त, डिंग्या गावातील शेतालगत सागवान साठा आढळला



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१ धारणी –** धारणी वनपरिक्षेत्रातील खाऱ्या बीट अंतर्गत डिंग्या गावात अवैधरीत्या साठवून ठेवलेल्या सागवान लाकडावर वनविभागाने धडक कारवाई केली. गुप्त माहितीच्या आधारे केलेल्या या कारवाईत कटसाईजचे तब्बल २७ सागवान नग जप्त करण्यात आले असून, जप्त लाकडाची अंदाजे किंमत ३४ हजार ९४३ रुपये असल्याची माहिती वनविभागाने दिली. वनविभागाला ३१ ऑगस्ट २०२६ रोजी डिंग्या गाव परिसरात अवैध सागवान लाकूड साठवून ठेवल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. त्यानुसार वनपथकाने संबंधित परिसरातील एका शेताच्या बांधालगत तपासणी केली. यावेळी मोठ्या प्रमाणात सागवान लाकूड अवैधरीत्या साठवून ठेवल्याचे निदर्शनास आले. वनअधिकाऱ्यांनी तातडीने पंचनामा करून २७ सागवान नग ताब्यात घेतले. जप्त करण्यात आलेला लाकूडसाठा वनविभागाच्या ताब्यात सुरक्षित ठेवण्यात आला असून, या प्रकरणामागे कोणाचा सहभाग आहे, लाकूड कुठून आणण्यात आले आणि त्याचा पुढील व्यवहार कोणाकडे होणार होता, याबाबत तपास सुरू करण्यात आला आहे. ही कारवाई उपवनसंरक्षक, मेळघाट वनविभाग (प्रादेशिक) जयोती बैनर्जी यांच्या निर्देशानुसार करण्यात आली. सहायक वनसंरक्षक तसेच धारणीचे वनपरिक्षेत्र अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली वनविभागाच्या पथकाने ही धडक कारवाई केली. कारवाईत वनपाल पी. एस. चंदे, एस. एच. मेटकर, वनरक्षक एम. बी. काळे, विशाल पांडे, संदीप इंगळे तसेच वनमजूर रहमान शेख व राहुल बातमडे यांनी सहभाग घेतला. दरम्यान, जप्त सागवान लाकडाप्रकरणी पुढील चौकशी वनपाल पी. एस. चंदे करीत आहेत.

# नांदगांव खंडेश्वर घनकचरा, सांडपाणी व्यवस्थापनाच्या प्रकल्पाच्या जागेला जिल्हाधिकाऱ्यांची मंजुरी

## नगराध्यक्ष नगरसेवकांनी मानले जिल्हाधिकाऱ्यांचे आभार



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१नांदगांव खंडेश्वर–** शहरातील नगर पंचायतच्या घनकचरा व्यवस्थापन व सांडपाणी व्यवस्थापनाच्या जागेचा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित होता नगर पंचायतीनी जिल्हाधिकारी यांचेकडे पाठपुरावा करून अखेर सदर जागेला जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी मान्यता देऊन हा प्रश्न मार्गी लावल्याने नगराध्यक्ष सौ.प्राप्ती मारोटकर व नगरसेवकांनी जिल्हाधिकारी यांना शॉल पुष्पगुच्छ देऊन आभार मानले. नगर पंचायत अस्तित्वात आली तेव्हा पासून शहरात घनकचरा व्यवस्थापनाचा प्रकल्पाच्या जमिनीचा प्रश्न १० वर्षांपासून प्रलंबित होता. शहरातील गोळा होणाऱ्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्याकरिता जागा उपलब्ध नसल्याने स्वच्छतेवर प्रश्नाचिन्ह अनेक वर्षांपासून निर्माण झाला होते सन २०२६ मध्ये नगर पंचायतची निवडणूक होऊन नवनियुक्त नगराध्यक्ष, सर्व नगरसेवक यांनी शासन स्तरावर व मुख्याधिकारी, स्वच्छता निरीक्षक यांचे यशस्वी पाठपुराव्याला अखेर यश आले असून मौजा बच्छाराजपुर येथील २ हेक्टर जागा घनकचरा व्यवस्थापना करिता व शहरातील सांडपाणी व्यवस्थापना करिता मौजे मुंड झुंझारराव १ हेक्टर जागेला मंजुरात दिली असून शहरातील स्वच्छता व आरोग्य विषयक विकासाच्या दृष्टीने शहराच्या विकासात भर पडणार आहे. १० वर्षांपासून प्रलंबित असलेला जागेचा प्रश्न मार्गी लावल्याने जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांची नुकतीच नगराध्यक्ष नगरसेवक यांनी भेट घेऊन त्यांचा सत्कार करीत आभार मानले यावेळी नगराध्यक्ष सौ प्राप्ती मारोटकर, उपनगराध्यक्ष अब्दुल जमीर, स्वच्छता सभापती सौ ज्योत्स्ना धवसे, सभापती कांता लोमटे,मो. रियाज, वासुदेव लोखंडे न.पं. गटनेते प्रकाश मारोटकर नगरसेवक सौ प्रीती इखार शीला वाडेकर आयेशा शेख रजियाबी सलाम मो. साजिद अमोल धवसे शेख हारून मो. शारुख इत्यादी उपस्थित होते.

# करजगाव परिसरात वाघ नव्हे, बिबट्याचा वावर


## वनविभागाकडून नागरिकांना सतर्कतेचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१तिवसा –** तिवसा तालुक्यातील करजगाव परिसरात वाघ दिसल्याची माहिती रविवारी सकाळी पसरल्यानंतर परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. या घटनेची माहिती मिळताच वनविभागाच्या पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेत परिसराची सखोल पाहणी केली. पाहणीदरम्यान आढळलेल्या ठशांची तपासणी केल्यानंतर ते वाघाचे नसून बिबट्याचे असल्याचे वनविभागाच्या प्राथमिक निरीक्षणात स्पष्ट झाले आहे. वाघ दिसल्याच्या चर्चेमुळे करजगावसह दापोरी, सातरगाव आणि आसपासच्या गावांतील नागरिकांमध्ये काही काळ संभ्रम निर्माण झाला होता. मात्र वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी परिस्थितीची पडताळणी करून नागरिकांना वस्तुस्थितीची माहिती दिली. संबंधित भागात बिबट्याचा वावर असण्याची शक्यता लक्षात घेऊन वनविभागाकडून सतत निरीक्षण ठेवण्यात येत आहे. वनविभागाने नागरिकांना विशेष खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे. शेतशिवारात एकटे जाणे टाळावे, विशेषतः पहाटे व सायंकाळच्या वेळेत सावधगिरी सोडू नये तसेच पाळीव जनावरांचीयोग्य काळजी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. कोणत्याही वन्यप्राण्याचा वावर आढळल्यास किवा संशयास्पद हालचाल दिसल्यास तात्काळ वनविभागाशी संपर्क साधावा, असेही सांगण्यात आले. दरम्यान, परिसरात वाघ असल्याच्या अफवा सोशल मीडियावर वेगाने पसरत असल्याने नागरिकांनी अप्रमाणित संदेशांवर विश्वास ठेवू नये आणि अधिकृत माहितीवरच भरोसा ठेवावा, वनविभागाने केले आहे. सध्या परिस्थिती नियंत्रणात असून वनविभागाचे पथक परिसरावर बारकाईने लक्ष ठेवून आहे.



# जनावरांची तस्करी रोखण्याच्या मोहिमेदरम्यान बोलेरो गाडीने पोलिसाला चिरडण्याचा प्रयत्न




**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१मोर्शी** जनावरांची तस्करी राखण्याच्या मोहिमेदरम्यान एका अज्ञात बोलेरो पिकअप चालकाने एका पोलिसाला ठार मारण्याचा प्रयत्न केल्याची एक गंभीर घटना उघडकीस आली आहे. या घटनेत पोलिसाच्या उजव्या खांद्याला आणि शरीराच्या इतर भागांना गंभीर दुखापत झाली आहे. मोर्शी पोलिसांनी हत्येचा प्रयत्न यासह विविध कलमांखाली गुन्हा दाखल केला आहे. ही घटना २८ ऑगस्ट रोजी रात्री १० ते ११ च्या दरम्यान मोर्शी शहरातील जयस्तंभ चौकापासून सुमारे एक किलोमीटर पूर्वेला घडली. पोलिसांनी या प्रकरणी कारवाई केली असून चालकाविरुद्ध तक्रार दाखल केली आहे. तक्रारीनुसार, एक पांढरा बोलेरो पिकअप ट्रक कत्तलीसाठी जनावरे घेऊन जात होता. वाहन हिरव्या ताडपत्रीने झाकलेले होते. पिकअप ट्रकला पुढची नंबर प्लेट नव्हती, तर मागच्या बाजूला नंबर प्लेटच्या जागी ठळक अक्षरात 'शेतकरी' असे लिहिलेले होते आणि ३४९० हा क्रमांक होता. मिळालेल्या माहितीनुसार, पोलीस कर्मचारी अधिकृत कर्तव्यावर असताना,जनावरांच्या तस्करीच्या संशयावरून ते वाहन थांबवून कारवाई करण्याचा प्रयत्न करत होते. त्याचवेळी, भरधाव वेगाने गाडी चालवणाऱ्या चालकाने पोलिसाला ठार मारण्याच्या उद्देशाने वळण घेतले. तक्रारीनुसार, बोलेरो पिक अप ट्रकच्या त्याच्या अंगावरून गाडी घालण्याचा प्रयत्न केला. या धडकेमुळे पोलिसाच्या उजव्या खांद्याला गंभीर दुखापत झाली आणि त्याचा खांदा निखळला. तसेच, त्याच्या उजव्या कोपराला, दोन्ही गुडघ्यांना, कंबर आणि पाठीलाही गंभीर दुखापत झाली.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / PDF / वेब – पोर्टल /ई – पेपर

# पालकमंत्र्यांकडून बाधित नवजात बालकांच्या प्रकृतीची विचारपूस

## परिचारिकांशी संवाद: घटनेच्या वेळेची घेतली माहिती

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१अमरावती** जिल्हा स्त्री रुग्णालयातील २४ ऑगस्ट रोजी घडलेल्या दुर्दैवी दुर्घटनेतील बाधित बालकांची राज्याचे महसूल व पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सोमवारी सायंकाळी प्रत्यक्ष भेट देऊन आस्थेने विचारपूस केली. त्यांनी पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (पीडीएमसी) तसेच मुरके हॉस्पिटलला भेट देऊन उपचारधीन बालकांच्या आरोग्याची माहिती घेतली, तसेच जिल्हा स्त्री रुग्णालयातील दुर्घटनाग्रस्त नवजात अतिदक्षता विभागाची पाहणी केली.



पीडीएमसी आणि मुरके रुग्णालयात उपचार घेत असलेल्याकाही नवजात बालकांची प्रकृती धोक्याबाहेर आल्याने त्यांना डिस्चार्ज देण्यात आला आहे, तर उर्वरित बालकांवर विशेष डॉक्टरांच्या देखरेखीखाली उपचार सुरू आहेत. पालकमंत्री ना. बावनकुळे यांनी वैद्यकीय अधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा करून बालकांच्या उपचाराबाबत मार्गदर्शन केले. तसेच, उपचाराधीन बालकांच्या माता-पित्यांची भेट घेऊन त्यांना धीर देत राज्य शासन तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे, असा विश्वास दिला.त्यानंतर पालकमंत्र्यांनी जिल्हा स्त्री रुग्णालयातील दुर्घटनाग्रस्त कक्षाची पाहणी करून प्रशासकीय अधिकारी आणि वरिष्ठ डॉक्टरांकडून दुर्घटनेची सविस्तर माहिती घेतली. दुर्घटनेच्यावेळी नवजात बालकांना अतिदक्षता विभागातून सुखरूप बाहेर काढणाऱ्या परिचारकांशी त्यांनी चर्चा केली व माहिती जाणून घेतली. यावेळी रुग्णालयातील सुरक्षितता आणि आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्याच्यादृष्टीने त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या.

या पाहणी दौऱ्याप्रसंगी खासदार डॉ. अनिल बोंडे, आमदार प्रवीण पोटे, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, महापालिका आयुक्त मंगेश गोंदावले, पोलीस आयुक्त राकेश ओला आणि जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. विनोद पवार यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# मृत बालकांच्या कुटुंबीयांना ५ लाखांची मदत

## पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते धनादेशाचे वितरण

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१अमरावती** जिल्हा स्त्री रुग्णालयातील नवजात शिशु अतिदक्षता विभागात झालेल्या भीषण अग्निकांडात मृत्युमुखी पडलेल्या तीन नवजात बालकांच्या कुटुंबीयांना राज्य शासनाकडून जाहीर करण्यात आलेली प्रत्येकी पाच लाख रुपयांची आर्थिक मदतवितरित करण्यात आली. जिल्हाधिकारी कार्यालयात पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते मृत बालकांच्या पालकांना मदतीचे धनादेश सुपूर्द करण्यात आले.



२४ ऑगस्ट रोजी जिल्हा स्त्री रुग्णालयातील नवजात शिशु अतिदक्षता विभागात व्हेंटिलेटरमध्ये स्पार्क झाल्याने आग लागली होती. या दुर्घटनेत तीन नवजात बालकांचा दुर्दैवी मृत्यू झाला, तर सहा बालके गंभीर जखमी झाली होती. घटनेची गंभीर दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मृत बालकांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी पाच लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली होती. तसेच जखमी बालकांच्या उपचाराचासंपूर्ण खर्च शासनाकडून करण्याचे निर्देश दिले होते. घटनेनंतर आठ दिवसांनी सोमवारी मृत बालकांच्या पालकांना शासनाच्या मदतीचे धनादेश देण्यात आले. यामध्ये पुलगाव येथील गाडगेनगर परिसरातील पूजा स्वप्निल बोरगे, अंजनगाव सुर्जी तालुक्यातील तुरखेड येथील गायत्री प्रफुल चोपडे तसेच चिखलदरा तालुक्यातील बोराळा येथील किरण बेठेकर, गंगाराम बेठेकर यांचा समावेश आहे. यावेळी खासदार डॉ. अनिल बोंडे, आमदार रवि राणा, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. विनोद पवार, तुषार भारतीय, भाजप प्रवक्ते शिवराय कुलकर्णी, आरती वानखडे आदी उपस्थित होते.

# विदर्भावर पावसाचं संकट! नागपूर-अमरावतीत सरासरीपेक्षा २२% पावसाची तूट

### ऑगस्ट महिन्यात दशक भरातील सर्वात कमी पाऊस

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१अमरावती-** येणाऱ्या काळात विदर्भवासियांना जलसंकटाच्या अतिशय गंभीर स्थितीचा सामना करावा लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे. 'एल-निनो'च्या सावटाखाली संपूर्ण ऑगस्ट महिन्यात विदर्भात सरासरी केवळ १२५.५ मि.मी. पाऊस झाला असून ही दशकभरातील ऑगस्ट महिन्याची सर्वात कमी नोंद ठरली आहे. या कालावधीत सरासरी २९७.१ मि.मी. पाऊस होणे अपेक्षित असून या तुलनेत तब्बल ५८ टक्के कमी पाऊस झाला आहे.



ऑगस्टमध्ये सर्वच जिल्ह्यांमध्ये सरासरीपेक्षा कमी पाऊस झाला. अकोला येथे ३३.५ मि.मी. पाऊस झाला असून तूट तब्बल ८४ टक्के आहे. अमरावतीत ४६.४ मि.मी. (-८२ टक्के), बुलढाण्यात ७६.१ मि.मी. (-६१ टक्के), चंद्रपुरात १५९ मि.मी. (-५५ टक्के), गडचिरोलीत २९३.६ मि.मी. (-३२ टक्के),गोंदियात २९५ मि.मी. (२८ टक्के) पावसाची नोंद झाली.नागपुरात ऑगस्टमध्ये ८३.६ मि.मी. पाऊस झाला असून सरासरी २८६.४ मिमीच्या तुलनेत तब्बल ७१ टक्के तूट आहे. वर्धा (-७३ टक्के), वाशिम (७१ टक्के) आणि यवतमाळ (-७८ टक्के) येथेही पावसाने मोठी ओढ दिली. भंडारा जिल्ह्यात २०७ मि.मी. पाऊस झाला, जो सरासरीपेक्षा ४३ टक्के कमी आहे. गोंदिया व गडचिरोली वगळता कुठेही समाधानकारक पावसाची नोंद झाली नाही. त्यामुळे भविष्यात पाणी टंचाईचा सामना करावा लागण्याची शक्यता तर आहेच, मात्र दुष्काळसदृश्य परिस्थिती असल्याने शेतकरी संकटात सापडण्याची शक्यता आहे.जून ते आतापर्यंत २२ टक्के तुट दरम्यान, १ जून ते ३१ ऑगस्टदरम्यान विदर्भात ६०७.१ मि.मी. पाऊस झाला आहे. या कालावधीतील ७८१.८ मि.मी. सरासरीच्या तुलनेत पावसाची तूट २२ टक्के आहे. या कालावधीत गोंदिया व बुलढाणा वगळता बहुतांश जिल्ह्यांमध्ये सरासरीपेक्षा कमी पाऊस झाला आहे. नागपुरात जून ते ऑगस्ट दरम्यान ५३८.३ मि.मी. पाऊस झाला असून सरासरी ७७७.६ मिमी च्या तुलनेत ३१ टक्के तूट आहे.-

# १३ पत्रांचा कचऱ्यातच ढीग! स्वच्छता विभागाच्या मनमानीविरोधात नागरिकांचा एल्गार

## आता महापालिकेतच कचरा फेकण्याचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१अमरावती**

अमरावती महानगर पालिकेच्या स्वच्छता विभागाचा भोंगळ कारभार आणि संबंधित कंत्राटदारांच्या मनमानीमुळे प्रभाग क्रमांक १ मधील नागरिकांचा संयम अखेर सुटला आहे. परिसरातील कचरा उचलला जात नसल्याने आणि नियमित स्वच्छतेचा पूर्णपणे बोजवारा उडाल्याने नागरिकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे. विशेष म्हणजे, या गंभीर समस्येबाबत प्रशासनाकडे तब्बल १३ वेळा नगरसेवक चंदू खेडकर यांनी पत्रव्यवहार करूनही कोणतीही ठोस दखल घेण्यात आली नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. त्यामुळे आता प्रशासनाने तातडीने कारवाई न केल्यास प्रभागातील नागरिकांना सोबत घेऊन थेट महापालिका कार्यालयातच कचरा आणून ओतण्याचा आक्रमक इशारा देण्यात आला आहे.प्रभाग क्रमांक १ मधील विविध भागांमध्ये स्वच्छतेची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत चालली आहे. अनेक ठिकाणी कचऱ्याचे ढीग साचत असून, नियमित कचरा संकलन होत नसल्याची नागरिकांची तक्रार आहे. दुर्गंधी, अस्वच्छता आणि वाढत्या कचऱ्यामुळे परिसरातील नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्नही निर्माण झाला आहे. मात्र, या सर्व परिस्थितीकडे स्वच्छता विभाग आणि संबंधित कंत्राटदार जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याचा संतप्त आरोप करण्यात येत आहे.या समस्येच्या निराकरणासाठी नागरिकांनी आणि संबंधितांनी प्रशासनाला तब्बल १३ पत्रे व निवेदने दिली. प्रत्येक वेळी स्वच्छतेची स्थिती सुधारण्याची मागणी करण्यात आली. मात्र, ही



सर्व पत्रे केवळ कागदावरच राहिली असून, प्रत्यक्षात एकाही तक्रारीवर प्रभावी अंमलबजावणी करण्यात आली नसल्याचा दावा करण्यात आला आहे. वारंवार तक्रारी करूनही परिस्थितीत कोणताही बदल होत नसल्याने नागरिकांमध्ये आता प्रशासनाविरोधात रोष वाढला आहे.स्वच्छता विभाग आणि कंत्राटदारांमधील समन्वयाचा अभाव, कर्मचाऱ्यांची अनियमितता आणि तक्रारींकडे होणारे दुर्लक्ष यामुळे प्रभागातील स्वच्छता व्यवस्था पूर्णपणे कोलमडल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. नागरिकांच्या मूलभूत सुविधांशी संबंधित प्रश्नावर प्रशासनाकडून अशी उदासीन भूमिका घेतली जात असल्याने संतप्त नागरिकांनी आता आंदोलनाचा मार्ग स्वीकारण्याचा निर्णय घेतला आहे.यापुढेही कचरा उचलण्यासह स्वच्छतेची व्यवस्था सुरळीत करण्यात आली नाही आणि कंत्राटदारांची मनमानी थांबली नाही, तर प्रभागातील नागरिकांना एकत्र घेऊन महापालिका कार्यालयातच कचरा आणून टाकण्यात येईल, असा थेट इशारा देण्यात आला आहे. त्यामुळे प्रभाग क्रमांक १ मधील स्वच्छतेचा प्रश्न आता केवळ तक्रारींपुरता मर्यादित न राहता आंदोलनाच्या उंबरठ्यावर पोहोचला आहे.आता १३ पत्रांकडे दुर्लक्ष करणारे महापालिका प्रशासन नागरिकांच्या या आक्रमक इशाऱ्यानंतर तरी जागे होणार का आणि स्वच्छता विभाग तसेच संबंधित कंत्राटदारांवर कोणती ठोस कारवाई करणार, याकडे प्रभागातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.-

# पंतप्रधान मोदींना जगातील सर्व देशांचे पुरस्कार मिळाले, तर आश्चर्य नाही !

### नवनीत राणा यांनी व्यक्त केला आनंद



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१अमरावती-**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना उझबेकिस्तानचे राष्ट्राध्यक्ष शौकत मिर्झियोयेव्ह यांच्या हस्ते 'ऑलीय दर्जली दोस्तलिक' (सर्वोच्च मैत्रीचा सन्मान) हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. भारत आणि उझबेकिस्तान या दोन देशांमधील द्विपक्षीय संबंध आणि मैत्री अधिक दृढ करण्यात दिलेल्या अतुलनीय योगदानाबद्दल त्यांना हा सन्मान देण्यात आला आहे. हा उझबेकिस्तानकडून परदेशी नेत्यांना दिला जाणारा सर्वोच्च नागरी सन्मान आहे.

या ऐतिहासिक आणि अभिमानास्पद घटनेवर भाजप नेत्या आणि अमरावतीच्या माजी खासदार नवनीत राणा यांनी आनंद व्यक्त केला असून, विरोधकांवर जोरदार निशाणा साधला आहे. पंतप्रधान मोदींच्या या जागतिक यशाचे कौतुक करताना नवनीत राणा म्हणाल्या की, जगात लवकरच असा एकही देश उरणार नाही, ज्याने आपल्या पंतप्रधानांना पुरस्कार प्रदान केला नसेल. संपूर्ण जग त्यांच्या नेतृत्वाची दखल घेत आहे,

त्यामुळे यापुढे विरोधकांनी या गोष्टीचे आश्चर्य वाटून घेऊ। नये. पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखाली भारताचा जागतिक स्तरावर सातत्याने दबदबा वाढत असून हा प्रत्येक भारतीयासाठी अभिमानाचा क्षण असल्याचेही त्या म्हणाल्या.

# निवडणुकीला आठ महिने; विकासकामे कुठे? आश्वासनांच्या पलीकडे नागरिकांना गाजरच

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१अंजनगाव सुर्जी**

अंजनगाव सुर्जी नगरपरिषद निवडणुकीला तब्बल आठ महिने उलटून गेले असतानाही शहरातील काही प्रभागांमध्ये मूलभूत नागरी सुविधांची अवस्था जैसे थेच असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आणि संतापाचा सूर उमटत आहे. काही भागांत अद्याप रस्ते व नाल्यांची सुविधा नाही, खेळाची मैदाने अस्वच्छ आहेत, काटेरी झुडपे व गवत वाढले आहे, तर झाडू आणि नाली सफाई कर्मचारी नियमितपणे येत नसल्याच्या नागरिकांच्या तक्रारी आहेत. वारंवार तक्रारी व निवेदने देऊनही अपेक्षित दखल घेतली जात नसल्याने 'नागरिकांचा वाली कोण?' असा सवाल उपस्थित केला जात आहे. शहरातील काही प्रभागांमध्ये रस्त्यांची अवस्था अत्यंत खराब झाली असून अनेक रस्ते अक्षरशः चाळणीसारखे झाले आहेत. पावसाळ्यात खड्ड्यांमध्ये पाणी साचत असल्याने नागरिकांना ये-जा करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. काही ठिकाणी अद्याप रस्तेच नसल्याने नागरिकांना गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. त्याचबरोबर नाल्यांची व्यवस्था नसलेल्या भागांमध्ये सांडपाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे.खेळाच्या मैदानांची अवस्थाही चिंताजनक आहे. मैदानांमध्ये मोठ्या प्रमाणात गवत व काटेरी झुडपे वाढल्याने लहान मुलांना खेळण्यासाठी सुरक्षित जागा उपलब्ध होत नाही. शहरातील सार्वजनिक मैदानांची नियमित स्वच्छता करून ती नागरिकांसाठी वापरण्यायोग्य ठेवण्याची जबाबदारी नगरपरिषद प्रशासनाची असताना त्याकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.स्वच्छतेच्या प्रश्नावरही नागरिकांमध्ये नाराजी आहे. काही प्रभागांमध्ये झाडू कर्मचारी नियमित येत नसल्याने रस्त्याच्या कडेला कचरा साचतो. नाल्यांची नियमित साफसफाई होत नसल्यामुळे दुर्गंधी आणि डासांचा प्रादुर्भाव वाढत आहे. डासांची फवारणीही नियमित होत नसल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. विशेषतः पावसाळ्यात डासांची संख्या वाढत असताना




फवारणीची प्रभावी व्यवस्था करणे आवश्यक असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.पथदिव्यांच्या समस्येनेही नागरिक त्रस्त आहेत. काही ठिकाणी जुने पथदिवे बंद आहेत, तर काही भागांमध्ये आवश्यक असतानाही नवीन पथदिवे बसविण्यात आलेले नाहीत. त्यामुळे रात्रीच्या वेळी नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होत आहे.याशिवाय काही प्रभागांमध्ये घंटागाडी नियमित येत नसल्याच्या तक्रारी आहेत. परिणामी नागरिकांना कचरा साठवून ठेवावा लागत असून परिसराच्या स्वच्छतेवर त्याचा परिणाम होत आहे. नागरिकांकडून वारंवार नगरपरिषदेकडे तक्रारी व निवेदने देण्यात येत असतानाही त्यावर ठोस कार्यवाही होत नसल्याची भावना वाढीस लागली आहे.निवडणुकीपूर्वी नागरिकांना विविध विकासकामांची आश्वासने देण्यात आली. मात्र, निवडणूक होऊन आठ महिने उलटूनही प्रत्यक्षात कोणती विकासकामे झाली, असा प्रश्न आता नागरिक विचारत आहेत. 'आश्वासनांच्या पलीकडे विकासाचे गाजरच; प्रत्यक्ष काम मात्र कुठे?' असा संतप्त सवाल नागरिकांमधून उपस्थित होत आहे.या पार्श्वभूमीवर नगराध्यक्ष व मुख्याधिकाऱ्यांनी कार्यालयीन बैठकीपुरते मर्यादित न राहता स्वतः रस्त्यावर उतरून शहरातील सर्व प्रभागांची पिंजून पाहणी करावी. प्रत्येक प्रभागातील समस्या प्रत्यक्ष पाहून नागरिकांशी संवाद साधावा, संबंधित अधिकाऱ्यांना जबाबदारी निश्चित करून कामांना कालमर्यादा द्यावी आणि प्रभागनिहाय विकास आराखडा जाहीर करावा, अशी मागणी जोर धरत आहे.निवडणुकीनंतर आठ महिन्यांचा कालावधी उलटला; आता आश्वासनांचा नव्हे तर प्रत्यक्ष विकासकामांचा हिशेब द्या, अशी भूमिका नागरिकांनी घेतली आहे.-

# कमी पावसाचा संत्रा बागांना दुहेरी फटका

## कीड वाढली, संत्र्याची फळगळ

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१तिवसा** तिवसा तालुक्यात यंदा पावसाचे प्रमाण अपेक्षेच्या तुलनेत कमी राहिल्याने त्याचा विपरित परिणाम संत्रा बागांवर होत असल्याचे चित्र दिसून येत आहे. कमी पावसामुळे संत्रा बागांमध्ये प्रतिकूल वातावरण निर्माण होऊन विविध किडींचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढला आहे. परिणामी संत्र्याची फळगळ सुरू झाली असून, अनेक शेतकऱ्यांच्या बागांमधील तोंडाशी आलेला बहार गळून पडत असल्याने संत्रा उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे.

यंदा तालुक्यात पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने संत्रा बागांना आवश्यक तेवढा ओलावा मिळाला नाही. कमी पावसामुळे बागांमध्ये विविध प्रकारच्या किडींचा प्रादुर्भाव वाढल्याचे शेतकऱ्यांकडून सांगण्यात येत आहे. किडींच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे संत्र्याच्या फळांवर परिणाम होत असून, फळगळ मोठ्या प्रमाणात होत आहे. शेतकऱ्यांनी महागडी औषधे, खते तसेच फवारण्यांवर खर्च करून



बागा वाचविण्याचा प्रयत्न केला. मात्र, कमी पाऊस आणि वाढता किडीचा प्रादुर्भाव यामुळे शेतकऱ्यांच्या अडचणी कमी होण्याऐवजी वाढतच आहेत.

संत्रा बागेतील पीक तोंडाशी आले असताना मोठ्या प्रमाणात फळगळ होत असल्याने शेतकऱ्यांच्या वर्षभराच्या मेहनतीवर पाणी फेरले जाण्याची भीती निर्माण झाली आहे. उत्पादन चांगले मिळेल आणि केलेला खर्च भरून निघेल, अशी अपेक्षा असलेल्या शेतकऱ्यांना आता संभाव्य आर्थिक नुकसानीची चिंता सतावत आहे.कमी पावसामुळे आधीच बागांच्या व्यवस्थापनाचा खर्च वाढला आहे. त्यात किडीचा वाढता प्रादुर्भाव आणि फळगळ यामुळे संत्रा उत्पादक शेतकरी दुहेरी संकटात सापडला आहे. काही शेतकऱ्यांच्या बागांमध्ये मोठ्या प्रमाणात संत्री गळून पडल्याने नुकसानीचे प्रमाण गंभीर असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

भांबोरा आणि अहमदाबाद परिसरातील संत्रा बागांची कृषी व महसूल विभागाने तातडीने पाहणी करावी. कमी पावसामुळे झालेली प्रतिकूल परिस्थिती, किडीचा प्रादुर्भाव आणि मोठ्या प्रमाणात झालेली फळगळ यांचे वस्तुनिष्ठ सर्वेक्षण करून नुकसानीचे पंचनामे करावेत, अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे.

कमी पावसामुळे संत्रा बागेत किडीचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढला आहे. महागडी औषध फवारणी करूनही संत्र्याची गळती थांबत नसल्याने मोठे नुकसान होत आहे. तोंडाशी आलेला बहार डोळ्यांसमोर गळून पडत असल्याने वर्षभराची मेहनत वाया जाण्याची भीती आहे. शासनाने तातडीने संत्रा बागांची पाहणी करून पंचनामे करावेत आणि नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी भांबोराचे पोलिस पाटील भालचंद्र पोल्हाड यांनी केली आहे.

# जागे व्हा! अमरावतीकरांनो जागे व्हा...

# १६७ वर्षे जुनी ब्रिटिशकालीन ऐतिहासिक रेल्वे स्थानक जमीनदोस्त करण्यास सुरुवात

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.१ अमरावती** राज्य सरकारने अधिकृतपणे 'हेरिटेज' (ऐतिहासिक वारसा) घोषित केलेले अमरावतीचे ऐतिहासिक जुने रेल्वे स्थानक चक्क जमीनदोस्त करण्याकडे प्रशासनाची वाटचाल सुरू आहे. तब्बल १६७ वर्षे जुनी असलेली ही ब्रिटिशकालीन वास्तू कोणाच्या परवानगीने तोडली जात आहे, असा संतप्त सवाल आता समस्त अमरावतीकर विचारू लागले आहेत. या धक्कादायक प्रकारामुळे शासनाने जाहीर केलेल्या हेरिटेज यादीला आणि नियमांना काही किंमत आहे की नाही, असा गंभीर प्रश्न आता उपस्थित झाला आहे.या प्रकरणाबाबत समस्त अमरावतीकरांनी एकत्र येत आवाज उठविणे गरजेचे आहे..



अमरावती रेल्वे स्थानकाचा इतिहास अत्यंत गौरवशाली आहे. सन १८५९ मध्ये या स्थानकाचे बांधकाम पूर्ण झाले होते आणि तिथून अमरावतीच्या रेल्वे वाहतुकीची ऐतिहासिक सुरुवात झाली होती. ब्रिटीशकालीन स्थापत्यशास्त्राचा हा एक उत्कृष्ट नमुना मानला जातो. याच ऐतिहासिक महत्त्वामुळे राज्य शासनाने अमरावती व बडनेरा शहरांमधील ज्या ५५ महत्त्वाच्या जुन्या वास्तू, इमारती आणि स्थळांना 'हेरिटेज' म्हणून घोषित केले आहे, त्या यादीत या जुन्या रेल्वे स्थानकाचा प्रामुख्याने समावेश आहे. असे असतानाही, प्रशासनाने हा ऐतिहासिक वारसा नष्ट करण्याचा घाट रचल्याने इतिहासप्रेमींमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे.

प्रशासनाकडून या अत्यंत महत्त्वाच्या बाबीकडे सातत्याने दुर्लक्ष केले जात आहे, हे दुर्दैवी आहे.तर अमरावती मधील सर्वच राजकीय पक्षाचे नेते, पदाधिकारी मात्र चिडीचूप आहे हे विशेष. हे रेल्वे स्थानक पाडल्यास अमरावतीची शान आणि इतिहास कायमचा पुसला जाईल. हा ऐतिहासिक वारसा नष्ट न करता त्याचे तातडीने संवर्धन व सुशोभीकरण करणे गरजेचे आहे.

### ५५ स्थळे हेरिटेज यादीत; तरीही प्रशासनाचा मनमानी कारभार? नेते मंडळी चिडीचूप

शासकीय नियमांनुसार, हेरिटेज यादीत समाविष्ट असलेल्या कोणत्याही वास्तूचे मूळ स्वरूप बदलण्यास किंवा ती तोडण्यास कडक कायदेशीर निर्बंध असतात. अमरावती आणि बडनेरा शहराची ऐतिहासिक ओळख जपण्यासाठी ५५ वास्तू हेरिटेज म्हणून, तर अन्य सहा स्थळे आणि तलाव हे पर्यटन स्थळे म्हणून घोषित करण्यात आले आहेत. या वास्तूंचे जतन आणि संवर्धन करणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. मात्र, या सर्व नियमांना केराची टोपली दाखवत जुने रेल्वे स्टेशन पाडण्याचे काम सुरू झाल्याचे चित्र आहे.

# आयसीयू, एनआयसीयू आणि ओटीची दर सहा महिन्यात होणार विशेष तपासणी

## इलेक्ट्रिकल व फायर ऑडिटला प्राधान्य

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अमरावती :**

जिल्ह्यातील रुग्णालयांमध्ये अतिदक्षता विभागासह संवेदनशील वैद्यकीय विभागांच्या सुरक्षेकडे विशेष लक्ष देण्यात येणार आहे. अतिदक्षता विभाग (आयसीयू), नवजात शिशु काळजी केंद्र (एनआयसीयू) आणि शस्त्रक्रियागृह (ओटी) या विभागांची विशेष तपासणी करून तेथील इलेक्ट्रिकल आणि अग्निसुरक्षा व्यवस्थेचे सखोल ऑडिट करण्यास प्राधान्य दिले जाणार आहे.आयसीयू, एनआयसीयू आणि ओटी हे रुग्णालयातील अत्यंत संवेदनशील विभाग मानले जातात. या ठिकाणी गंभीर रुग्णांवर उपचार सुरू असतात.



तसेच नवजात शिशुंची विशेष काळजी घेतली जाते. त्यामुळे या विभागांमध्ये वापरण्यात येणारी वैद्यकीय उपकरणे, ऑक्सिजन पुरवठा यंत्रणा, व्हेंटिलेटर, मॉनिटरिंग सिस्टीम तसेच इतर हाय-व्होल्टेज उपकरणांच्या सुरक्षेची तपासणी अत्यंत महत्त्वाची ठरते.विशेषतः विद्युत यंत्रणेत बिघाड, शॉर्टसर्किट किंवा तांत्रिक त्रुटी निर्माण झाल्यास मोठा धोका उद्भवू शकतो. त्यामुळे विद्युत वायरिंग, पॅनेल, उपकरणांची जोडणी, अर्थिंग व्यवस्था आणि आपत्कालीन वीजपुरवठा यंत्रणेची तपासणी करण्यात येणार आहे. त्याचबरोबर अग्निशामक यंत्रणा, फायर अलार्म, धूर शोधक यंत्रणा आणि आपत्कालीन बाहेर पडण्याच्या मार्गांचीही पाहणी केली जाणार आहे.रुग्णालयातील संवेदनशील विभागांमध्ये कोणतीही दुर्घटना घडू नये, यासाठी संबंधित विभागांची नियमित तपासणी आणि आवश्यक दुरुस्ती करण्यावर भर दिला जाणार आहे. तपासणीदरम्यान आढळून येणाऱ्या त्रुटी तातडीने दूर करण्याच्या सूचना देण्यात येतील.या विशेष इलेक्ट्रिकल व फायर ऑडिटमुळे रुग्ण, नवजात बालके, त्यांचे नातेवाईक तसेच वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी अधिक सक्षम व्यवस्था उभारण्यास मदत होणार आहे.

### दुर्घटनेची जबाबदारी संस्थाप्रमुखांवर

ऑडिटमध्ये निष्काळजीपणा आढळल्यास किंवा भविष्यात आगीची कोणतीही दुर्घटना घडल्यास, त्याची थेट कायदेशीर आणि प्रशासकीय जबाबदारी संबंधित रुग्णालय व्यवस्थापन व संस्थाप्रमुखांवर निश्चित केली जाईल.

# डफरीन अग्नितांडव प्रकरणात बच्चू कडूंची एन्ट्री

## मृत चिमुकल्यांच्या कुटुंबीयांना १० लाखांची मदत, नोकरीसाठीही प्रयत्नांचे आश्वासन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अमरावती :**

शहरातील जिल्हा स्त्री रुग्णालय अर्थात डफरीन हॉस्पिटलमधील अतिदक्षता विभागात झालेल्या भीषण अग्नितांडवात तीन नवजात चिमुकल्यांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याने संपूर्ण जिल्हा हादरला होता. या हृदयद्रावक घटनेनंतर प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले असून, दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी विविध राजकीय पक्ष, सामाजिक संघटना आणि लोकप्रतिनिधींकडून करण्यात येत आहे. या प्रकरणात आता प्रहार जनशक्ती पक्षाचे नेते तथा आमदार बच्चू कडू यांनीही लक्ष घालत मृत बालकांच्या कुटुंबीयांची भेट घेत त्यांना मदतीचा हात देण्याचे आश्वासन दिले आहे.घटनेनंतर सत्ताधारी आणि विरोधी पक्षातील अनेक आमदार, खासदार तसेच नेत्यांनी डफरीन हॉस्पिटलला भेट देत परिस्थितीची पाहणी केली. या दुर्घटनेची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणीही करण्यात आली. दरम्यान, काही दिवस मतदारसंघाबाहेर असल्याने आमदार बच्चू कडू यांच्यावर राजकीय विरोधकांकडून टीका करण्यात येत होती. सोशल मीडियावरही त्यांना लक्ष्य करण्यात आले होते.मात्र, मतदारसंघात



परतताच बच्चू कडू यांनी थेट अग्नितांडवात मृत्युमुखी पडलेल्या चिमुकल्यांच्या कुटुंबीयांची भेट घेत त्यांचे सांत्वन केले. अंजनगाव तालुक्यातील तुरखेड येथील मृत बालकाच्या कुटुंबीयांची त्यांनी भेट घेतली. या वेळी दुःखी कुटुंबीयांशी संवाद साधत त्यांनी त्यांना धीर दिला.कुटुंबीयांच्या भेटीदरम्यान बच्चू कडू यांनी आरोग्यमंत्री यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधत पीडित कुटुंबाला तातडीने आर्थिक मदत देण्याबाबत चर्चा केली. आरोग्य विभागाकडून पाच लाख रुपये आणि मुख्यमंत्री सहायता निधीतून पाच लाख रुपये, अशी एकूण १० लाख रुपयांची आर्थिक मदत देण्याचे आश्वासन यावेळी देण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.याशिवाय मृत बालकाच्या कुटुंबातील एका सदस्याला डफरीन हॉस्पिटलमध्ये रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असे आश्वासनही बच्चू कडू यांनी दिले. अचानक ओढवलेल्या या दुःखद प्रसंगामुळे कुटुंबीयांवर कोसळलेल्या आर्थिक व मानसिक संकटाच्या पार्श्वभूमीवर या मदतीची घोषणा महत्त्वाची मानली जात आहे.बच्चू कडू यांच्या भेटीनंतर कुटुंबीयांनी त्यांचे आभार व्यक्त केले. मात्र, केवळ आश्वासनांवर न थांबता आर्थिक मदत आणि रोजगाराचे आश्वासन प्रत्यक्षात कधी पूर्ण होते, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.दरम्यान, डफरीन हॉस्पिटलमधील या अग्नितांडवाची चौकशी, दुर्घटनेला जबाबदार असणाऱ्यांवरील कारवाई आणि पीडित कुटुंबीयांना न्याय या मुद्द्यांवर बच्चू कडू पुढे कोणती भूमिका घेतात, हेही महत्त्वाचे ठरणार आहे. या संपूर्ण प्रकरणात प्रशासनाकडून दिलेली आश्वासने प्रत्यक्षात उतरतात का, याकडे अमरावतीकरांचे लक्ष लागले आहे.

# आंबिया बहारच्या संत्र्यांना आले सुगीचे दिवस

## ४८ रुपये प्रतिकिलो भाव, मागील वर्षाच्या तुलनेत दुप्पटीने वाढ

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१ पथ्रोट-** गेल्या काही वर्षांपासून संत्रापिकातील सातत्याने होणाऱ्या नुकसानीमुळे शेतकऱ्यांनी संत्राबागा तोडण्यास सुरवात केली असताना, यंदा आंबिया बहारच्या संत्र्यांना चांगला भाव मिळत आहे. सध्या ४८ रुपये ५९ पैसे प्रतिकिलो भाव मिळत



असल्याने संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. गेल्या काही वर्षांपासून संत्राबागांवर विविध रोगांचा प्रादुर्भाव वाढला आहे. उत्पादन खर्च वाढत असताना त्या तुलनेत उत्पन्न कमी मिळत असल्याने शेतकऱ्यांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे. जमिनीतूनच झाडांच्या मुळांवर रोगांचा प्रादुर्भाव होत असल्याने संत्रा झाडे वाळण्याचे प्रमाण वाढले आहे. त्यातच फळांची गुणवत्ता घसरल्याने बाजारपेठेत अपेक्षित भाव मिळणेही कठीण झाले आहे. निसर्गाची अवकृपा, बदलते वातावरण, कधी अतिवृष्टी तर कधी अत्यल्प पाऊस, यामुळे संत्राझाडांच्या मुळांवर परिणाम झाला आहे. परिणामी अनेक बागांची उत्पादन क्षमता घटली. रोगराईवर नियंत्रण मिळविण्यासाठी शेतकऱ्यांकडून विविध उपाययोजनांवर मोठ्या प्रमाणात खर्च करण्यात आला. मात्र, त्यानंतरही सातत्याने तोटा सहन करावा लागल्याने अनेक शेतकऱ्यांनी संत्राबागा तोडण्याचा निर्णय घेतला. अशा प्रतिकूल परिस्थितीतही काही शेतकऱ्यांनी जिद्दीने संत्राबागा जोपासल्या. मागील वर्षी संत्र्याला २० ते ३५ रुपये प्रतिकिलो भाव मिळाला होता. यंदा मात्र त्याच्या तुलनेत जवळपास दुप्पट भाव मिळत असल्याने उत्पादकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. सध्याच्या भावानुसार एका संत्र्याला सुमारे १२ रुपये नग भाव मिळत असल्याचे सांगण्यात येत आहे. अमरावती जिल्ह्यातून संत्र्याने भरलेले सुमारे १२५ मोठे ट्रक मद्रास, केरळ, दिल्लीसह विविध बाजारपेठांकडे रवाना होत आहेत. यामुळे शेतकऱ्यांसह व्यापाऱ्यांमध्येही समाधान व्यक्त होत आहे. यंदा पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने फळपिकांवरील रोगराईचे प्रमाण तुलनेने कमी झाले. त्यामुळे उत्पादनात वाढ झाली असून, बाजारपेठेतही चांगला भाव मिळत असल्याचे व्यापाऱ्यांकडून सांगण्यात आले.

# शासकीय वसतिगृहे, निवासी शाळांमधील विद्यार्थ्यांना आता 'टेट्रा पॅक' दूध

## समाजकल्याण आयुक्तांचा निर्णय, पराग आणि वारणा संघाला २६.४० रुपये दराने कंत्राट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अमरावती-**

राज्यभरातील शासकीय वसतिगृहे आणि शासकीय निवासी शाळांमध्ये राहणाऱ्या विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने राज्य सरकारने एक मोठा निर्णय घेतला आहे. या विद्यार्थ्यांना नियमित दूधपुरवठा करण्यासाठी राज्यस्तरीय प्रशासकीय विभाग खरेदी समितीने अखेर 'पराग मिल्क फूड' आणि 'श्री वारणा सहकारी दूध उत्पादक संघ लिमिटेड' यांची निवड केली आहे. या दोन्ही पुरवठादारांना प्रत्येकी ५० टक्के दूधपुरवठ्याचे कंत्राट देण्यास मंजुरी देण्यात आली असून, समाजकल्याण आयुक्त, पुणेंना तात्काळ पुरवठा करण्याचे निर्देश ३१ ऑगस्ट रोजी शासनादेशाद्वारे जारी करण्यात आले आहेत. प्रत्येक विद्यार्थ्यांना मिळणारे दूध दर्जेदार आणि सुरक्षित असावे, यासाठी २०० मि.ली.च्या टेट्रा पॅकमध्ये हा



दूधपुरवठा केला जाणार आहे. खरेदी समितीने यासाठी प्रति टेट्रा पॅक २६.४० रुपये असा दर निश्चित केला आहे. विशेष म्हणजे, हा मंजूर दर पुढील ३ वर्षांच्या कालावधीसाठी लागू राहणार असून, या ३ वर्षांत पुरवठादारांना कोणत्याही प्रकारची दरवाढ दिली जाणार नाही, अशी अट शासनाने घातली आहे, असे सामाजिक न्याय विभागाचे अवर सचिव सतीश खैरमोडे यांनी स्पष्ट केले आहे.

# राज्यात ५०१२ पदांच्या प्राध्यापक भरतीला मान्यता

## मुलाखतींचे होणार सीसीटीव्ही रेकॉर्डिंग अनिवार्य

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१अमरावती-** राज्य भरातील सार्वजनिक विद्यापीठांशी संलग्न असलेल्या अशासकीय अनुदानित वरिष्ठ महाविद्यालयांमधील 'सहायक प्राध्यापक' पदभरती प्रक्रियेला अखेर गती मिळाली आहे. या भरती प्रक्रियेत पूर्ण पारदर्शकता आणण्यासाठी शासनाने एक अत्यंत महत्त्वाचे पाऊल उचलले असून, आता संपूर्ण मुलाखत प्रक्रियेचे सीसीटीव्ही रेकॉर्डिंग करणे अनिवार्य करण्यात आले आहे. या संदर्भातील सविस्तर मार्गदर्शक तत्त्वे उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडून सोमवार ३१ ऑगस्ट २०२६ रोजी जारी करण्यात आली आहेत.वरिष्ठ महाविद्यालयांमधील १ ऑक्टोबर २०२५ रोजीच्या



विद्यार्थी संख्येनुसार परिगणित केलेल्या कार्यभारानुसार सहायक प्राध्यापक संवर्गातील रिक्त पदांपैकी ५ हजार १२ रिक्त पदांच्या भरतीला ११ फेब्रुवारी २०२६ च्या शासन निर्णयानुसार मान्यता देण्यात आली होती. संस्था स्तरावर होणाऱ्या सहायक प्राध्यापक पदाच्या नियुक्ती प्रक्रियेमध्ये कोणताही गैरप्रकार होऊ नये आणि पारदर्शकता टिकून राहावी, यासाठी शासनाने कडक पावले उचलली आहेत. मुलाखतीचे सीसीटीव्ही रेकॉर्डिंग मुलाखतीच्या दिनांकापासून किमान एक वर्ष गोपनीय दस्ताऐवज म्हणून संबंधित संस्थेला सुरक्षितपणे जतन करावे लागेल.राज्यभरातील अशासकीय अनुदानित वरिष्ठ महाविद्यालयांमधील ५,०१२ सहायक प्राध्यापक पदांच्या भरती प्रक्रियेला गती मिळाली असतानाच, शासनाने आता विद्यापीठे आणि शैक्षणिक संस्थांना कडक इशारा दिला आहे. या भरती प्रक्रियेत कोणत्याही प्रकारचा गैरव्यवहार किंवा वशिलेबाजी खपवून घेतली जाणार नाही, असे स्पष्ट करत शासनाने दोषी संस्थांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. या संदर्भातील सुधारित मार्गदर्शक सूचना उच्च व तंत्र शिक्षण विभागाने जारी केल्या आहेत

# अंजनगाव सुर्जी तालुक्यात 'इ-पीक पाहणी'

## ॲप ठप्प, दहिगाव रेचा सह तालुक्यात शेतकरी अडचणीत

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.१अंजनगाव सुर्जी**

तालुक्यातील दहिगाव रेचा सह संपूर्ण परिसरात 'इ-पीक पाहणी' ची प्रक्रिया पूर्णपणे खोळंबली आहे. शासकीय पातळीवर ११ ऑगस्टपासून इ-पीक पाहणीचा टप्पा सुरू झाला असला, तरी तांत्रिक त्रुटी आणि प्रशासकीय ढिसाळपणामुळे शेतकरी आपल्या पिकांची नोंदणी करण्यापासून वंचित राहण्याची भीती व्यक्त होत आहे. शेतकरी चिंतेत सापडले असून तहसील प्रशासन मात्र या समस्येकडे डोळेझाक करत असल्याचा आरोप स्थानिक शेतकऱ्यांकडून केला जात आहे.शासनाने पीक पाहणीची सर्व प्रक्रिया डिजिटल केली असली, तरी प्रत्यक्षात 'इ-पीक पाहणी' प चालत नसल्याच्या तक्रारींचा पूर आला आहे. शेतकरी स्वतः मोबाईलवरून पीक नोंदणी करू शकत नाहीत. सर्वर डाऊन असणे, लोकेशन न मिळणे आणि प वारंवार हँग होणे यामुळे शेतकरी त्रस्त झाले

### तहसीलदार यांना माहिती असूनही दुर्लक्ष?

### उत्सवाच्या काळात पोलीस पाटलांवर अतिरिक्त भार; सातबारा पीक नोंदीविना शेतकरी चिंतेत



आहेत. वेळेत पीक नोंद झाली नाही, तर सातबारा उतारा पिकांच्या नोंदीविना कोरा राहील आणि यामुळे पुढील काळात शासकीय योजना, पीक विमा, आणि नुकसान भरपाई मिळण्यात मोठ्या अडचणी निर्माण होतील.तसेच स्थानिक पातळीवर पोलीस पाटलांवर अतिरिक्त कामाचा ताण वाढत असल्याचे चित्र दिसत आहेइ-पीक पाहणीची नोंदणी शासकीय कर्मचाऱ्यांमार्फत करण्याची जबाबदारी देण्यात आली असली, तरी प्रत्यक्षात हे काम पोलीस पाटलांवर सोपवण्यात आले आहे. आधीच पोलीस प्रशासनाचा समन्वय आणि गावातील कायदा-सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी पोलीस पाटलांवर असते. त्यातच सध्या सण-उत्सवांचे दिवस सुरू असल्याने गावोगावी पोलीस पाटलांना २४ तास सतर्क राहावे लागत आहे. अशा परिस्थितीत पोलीस पाटलांनी कायदा व सुव्यवस्थेकडे लक्ष द्यावे की शेतकऱ्यांच्या इ-पीक पाहणीसाठी शेतात फिरत राहावे, असा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. अतिरिक्त भारामुळे पोलीस पाटीलही त्रस्त झाले आहेत.

### तर तहसीलदार कधी जागे होणार?


११ ऑगस्टपासून सुरू झालेल्या या प्रक्रियेला १५ दिवसांहून अधिक काळ उलटूनही अद्याप तांत्रिक अडचणींवर मात करण्यात आलेली नाही. प्रशासकीय पातळीवर या गोंधळाकडे सपशेल दुर्लक्ष केले जात असून शेतकरी चिंतेत आणि तहसील प्रशासन झोपेत अशीच काहीशी परिस्थिती अंजनगाव सुर्जी तालुक्यात पाहायला मिळत आहे.महसूल विभागाने व तहसीलदारांनी तात्काळ या समस्येची दखल घेऊन पमधील तांत्रिक अडचणी दूर कराव्यात, तसेच पोलीस पाटलांवरील अतिरिक्त ताण कमी करून या कामासाठी स्वतंत्र यंत्रणा किंवा मदतनीस उपलब्ध करून द्यावेत, अशी रास्त मागणी दहिगाव रेचा येथील शेतकऱ्यांनी केली आहे. आता तरी तहसीलदार या गंभीर प्रश्नाकडे लक्ष देऊन शेतकऱ्यांना दिलासा देणार का, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# गोलाई शाळेच्या आवारात बिबट्याच्या पायांचे ठसे

## संरक्षक भिंतीसह वनविभागाची गस्त वाढविण्याची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१ मेलघाट** गोलाई येथील माध्यमिक विद्यालय परिसरात वाघसदृश्य वन्यप्राण्याच्या पायांचे ठसे आढळून आल्याने विद्यार्थी, शिक्षक व पालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. माध्यमिक विद्यालय गोलाईचे मुख्याध्यापक अतुल माहिंद यांच्या माहितीनुसार, शाळा परिसरात वन्यप्राण्यांच्या पायांच्या खुणा आढळल्यानंतर वनविभागाच्या पथकाने घटनास्थळी पाहणी केली. हे ठसे बिबट्या किंवा वाघाचे



असल्याचे वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी सांगितले. दरम्यान, गोलाईलगतच्या मोथाखेडा गावातही बिबट्या दिसल्याचे ग्रामस्थांनी सांगितले आहे. शाळेच्या परिसराला संरक्षकभिंत नसल्याने वन्यप्राण्यांचा शाळेच्या आवारात प्रवेश होण्याची शक्यता आहे. याबाबत यापूर्वीही शासनाकडे मागणी करण्यात आली होती. मात्र, अद्याप संरक्षकभिंतीचे काम झालेले नाही. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी शाळेला तातडीने संरक्षकभिंत मंजूर करून बांधावी, अशी मागणी मुख्याध्यापक अतुल माहिंद यांनी केली आहे. तसेच वनविभागाने परिसरात नियमित गस्त वाढवून वन्यप्राण्यांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.


सांध्य मराठी दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
अमरावती येथून प्रकाशित
विदर्भ प्रजासत्ताक
सांध्य मराठी दैनिक
धन्यवाद वाचकांनो!
25 लाख वाचकांनी
आमच्या साईड ला भेट दिल्याबद्दल
विदर्भ प्रजासत्ताक
सांध्य मराठी दैनिक
मुख्य पृष्ठ अमरावती विदर्भ महाराष्ट्र देश-विदेश
ब्रेकिंग न्यूज
अमरावतीत विकासकामांचा धडाका
पावसाचा जोर वाढला
शेतकऱ्यांसाठी महत्वाची बातमी
राज्यातील राजकीय घडामोडी
क्रीडा क्षेत्रातील ताज्या बातम्या
HTTPS://E PAPER.VIDARBHAPRAJASATTAK.COM
आपल्या परिसरातील बातम्या व राज्यभरातील ताज्या घडामोडी
वाचा आता आमच्या सोबत
विदर्भ प्रजासत्ताक
सांध्य मराठी दैनिक
आमच्या चॅनल ला आजच जॉईन व्हा!
स्थानिक बातम्यांवर विशेष भर
राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व कृषी बातम्या
फोटो व व्हिडिओ सह अपडेट
तत्काळ व विश्वसनीय बातम्या
मो. 8605948853
Follow Us On :